Inward No. ..t/SSAC/370 /2022
Date :- 21/7/2022
Head, SSAC, Dr. PDKV, Akola

C/5

# निविदा (कोटेशन) सूचना

सन २०२२-२३ मध्ये मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील **कंत्राटी पद्धतीने** करावयाच्या खालील कामाकरीता कुशल /अकुशल मजुराचे (स्त्री/पुरुष) **प्रती हेक्टर/नग/दिन** दर खालीलप्रमाणे देण्यात यावे. दि. २६/०७/२०२२ पासुन दि. २/०८/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सीलबंद लिफाफा मध्ये सादर करावे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर रुपये / हे. / नग / दिन | शेरा |
|---|---|---|---|
| १ | नांगरणे ट्रॅक्टरने दोन फाळी / तीन फाळी | | |
| २ | मोगडणे फंटा वाही / पंजी | | |
| ३. | वखरणे ट्रॅक्टरने, बैलाने (वखार मजूरासहीत) | | |
| ४ | पट्टा पास /जांभूळवाही | | |
| ५ | काशा /धसकटे /कचरा वेचणे | | |
| ६ | शेणखत भरणे उतरविणे वाहतूक ५ टन (वाहन /मजुरासह) | | |
| ७ | शेणखत पसरविणे ५ टन | | |
| ८ | टोकण पद्धतीने पेरणी जास्त / कमी अंतर | | |
| ९ | तणनाशाकाची फवारणी ( ७०० ली.) नॅपसॅक स्प्रे व मजूरासहीत | | |
| १० | विरळणी जास्त/कमी अंतरावरील पीक | | |
| ११ | कोळपणी/डवरणी (बैल जोडी मजूरासह, ट्रॅक्टरसह | | |
| १२ | खुरपणी / निंदण (खरिफ/रब्बी) | | |
| १३ | वरखत देणे सरत्याद्वारे / बांगडी पद्धतीने / हाताने फेकणे. | | |
| १४ | फवारणी साधा स्प्रे. | | |
| १५ | पिकाला पाणी देणे, रान भिजवणे मोकाट पद्धत / स्प्रिंकलर. | | |
| १६ | पिक काढणी / कापणी सोयाबीन कापणी व खळ्यावर जमा करणे. ज्वारी कापणी, बांधणी, कणस खुडणे, खळ्यावर जमा करणे | | |
| १७ | गहू कापणे व बांधणे, खळ्यावर जमा करणे. | | |
| १८ | तूर कापणी व बांधणी, जामाकरणे, बडवणे व उपणने | | |

Head,
Deptt. of Soil Science & Agril. Chemistry,
Dr. PDKV, Akola

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | मळणी (थ्रेशर) प्रती क्विंटल मजूरासह. | | |
| २० | कापूस वेचणे प्रती किलो | | |
| २१ | कापूस बोजा भरणे (२ क्विंटल प्रती नग) | | |
| २२ | दांड तयार करणे | | |
| २३ | प्रक्षेत्राची चौकीदारी करणे (प्रती दिन) | | |
| २४ | कार्यालय परिसरातील स्वच्छता ठेवणे, झाडांना पाणी देणे. | | |

**निविदा सुचने मधील सर्व अटी शर्ती मला मान्य आहेत.**

**ठिकाण :**

**दिनांक :**

Head,
Deptt. of Soil Science & Agril. Chemistry,
Dr PDKV Akola

**विषय: सन २०२२-२३ मध्ये मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाची कामे उदा. विवध प्रयोगाचे व्यवस्थापन, निंदण, खते देणे, पाणी देणे, चौकीदारी करणे इत्यादी. कंत्राटी पद्धतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून मजुराचे (स्त्री/पुरुष) निविदा दर (कोटेशन) बोलविण्याबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने व विभाग प्रमुख मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील करावयाची कामे उदा. विवध प्रयोगाचे व्यवस्थापन, निंदण, खते देणे, पाणी देणे, चौकीदारी करणे इत्यादी. कंत्राटी पद्धतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून मजुराचे (स्त्री/पुरुष) निविदा दर (कोटेशन) बोलविण्याकरीता खालीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा सोबत जोडण्यात आलेला आहे.

---

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १ | निविदा पत्रिका / कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील. |
| २ | निविदा पत्रिका / कोटेशन विभाग प्रमुख मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला ह्या नावाने सीलबंद पाकिटामध्ये पाठवावे. |
| ३ | कंत्राटदाराकडे संबंधीत कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व ईतर सर्व कागदपत्र या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. |
| ४ | कंत्राटदाराला मिळालेल्या कामाच्या देयकाच्या १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून संबंधित कार्यालयात जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळवण्यासाठी संबंधित विभागाकडे अर्ज करावा लागेल, त्यानंतर सुरक्षा ठेव परत करता येईल. |
| ५ | कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे व्यवस्थापन, व तत्सम कामासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांच्या व्यवस्थापनाची संपूर्ण जवाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील. |
| ६ | विभाग प्रमुख मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला प्रक्षेत्रावरील प्रयोगाच्या व्यवस्थापनातील संबंधीत कामे करत असताना पिकाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधीत कान्त्रात्दाराकडून वसूल करण्यात येईल. |
| ७ | प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे कामे करत असताना कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील. |

Head,
Deptt. of Soil Science & Agril. Chemistry,
Dr. PDKV, Akola

८ नेमून देण्यात आलेले कामे काटेकोरपणे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत तक्रार असल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही, विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधीत कंत्राटदारांना बंधन कारक राहील.

९ कंत्राटदारांने देयक सादर करताना बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१० या कार्यालयात कंत्राटदारास प्रक्षेत्रावरील कामे करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबंधीत कामे पूर्ण करण्यासाठी साहित्य उपलब्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

११ कंत्राटदारास प्रक्षेत्रावरील संबंधीत कार्य पूर्ण झाल्यावर संबंधीत कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यासंबंधीत विभाग प्रमुख यांनी कार्य परिणामकारक पूर्ण झाल्याचे प्रमाणीत केल्या नंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१२ प्रक्षेत्रावरील संबंधीत कार्य करताना वापरण्यात येणाऱ्या मजुरांना कामगार कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाहनिधी देणे, रोकड पद्धतीचा वापर न करता नियमित भरणा करणे ई. संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

१३ प्रक्षेत्रावरील संबंधीत कार्य करताना कोणताही वाद विवाद उपस्थित झाल्यास सादर वाद विवाद विभागाचे अधिकारी / मा. अधिष्ठाता (कृषी) डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांच्या समक्ष मिटविला जाईल. तसेच अंतिम निर्णय मा. अधिष्ठाता (कृषी) डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांचा राहील आणि तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.

१४ प्रक्षेत्रावरील सर्व संबंधीत कामे ही एका वर्षामधील दोन्ही खरिफ, रब्बी व उन्हाळी हंगामाकरीता असून कामाचे दर एका वर्षा करीता वैध राहील.

१५ सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची असल्याचे रु.१०० चे स्टॅंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधीत कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

१६ वरील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशीला नुसार दि. ~~26/07/22~~ ते 2/08/2022 रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफा मध्ये सादर करावी.

Head,
**Deptt. of Soil Science & Agril. Chemistry,**
**Dr. PDKV, Akola**